स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक** 28–11–2014 रोजी **सकाळी 11–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. नरेन्द्र उर्फ बाल्या गोंविदराव बोरकर | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| 3. | सौ. भावना प्रशांत ढाकणे | सदस्या |
| 4. | श्री. हरिष सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| 5. | सौ. सविता मनोज सांगोळे | सदस्या |
| 6. | श्री. दुनेश्वर सुर्यभानजी पेठे | सदस्य |
| 7. | श्री. सागर दामोधर लोखंडे | सदस्य |
| 8. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 9. | सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 10. | सौ. संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 11. | सौ. सिंधु रामा उईके | सदस्या |
| 12. | सौ. रविंदर कौर बावा | सदस्या |
| 13. | श्री. देवा प्रसाद उसरे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | सौ. पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| 2. | श्रीमती इशरद नाहीद मो. जलील अंसारी | सदस्या |
| 3. | श्री. प्रशांत रामराव धवड | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. हेमंतकुमार पवार, अपर आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 272 :– नागपूर शहरातील स्वयंचलित वाहतुक सिग्नल असलेल्या चौकामध्ये झेब्रा क्रॉसींग व स्टॉप लाईनची मार्कींग करण्याचे कामाकरिता या कामास्तव प्राप्त निविदाकार मे. कॅटालाईन कंन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजीस प्रा.लि. यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 25 टक्केनी जास्त दराची निविदा राशी रु. 62,28,750/– ( बासस्ट लक्ष अठ्ठाविस हजार सातशे पन्नास रुपये फक्त ) प्रथम न्युनतम दराची निविदा मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 273</u> :– नागपूर शहरातील वाहतुक पोलीस पूर्व आणि दक्षिण शाखे अंतर्गत येणाऱ्या आय.आर.डी.पी. / क्रिप मुख्य रस्त्याला थर्मोप्लॉस्टीक पेंन्टनी पार्कींग पट्टा डिवायडर ऐज लाईन, लेन मार्कींग............इ. रोड मार्कींग करण्याचे कामाकरिता या कामास्तव प्राप्त निविदाकार मे. अमर इंटरप्रायजेस यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 25 टक्केनी जास्त दराची निविदा राशी रु. 34,37,500 / – ( चवतीस लक्ष सदतीस हजार पाचशे रुपये फक्त ) प्रथम न्युनतम दराची निविदा मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 274</u> :– प्रभाग क्र. 36 "अ" भांडेवाडी, वर्धमान नगर, देशपांडे ले–आऊट येथील रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. डी.सी. गुरूबक्षानी, यांची प्राकलनिय दरांपेक्षा 5 टक्के अधिक दराची रू. 55,54,026 / – रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करणे व पद क्र. A22001330802 अंतर्गत कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 275</u> :– प्रभाग क्र. 34–अ, म्हाडा कॉलनी येथे नागनदीला संरक्षण भिंत बांधकामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. 786 कंस्ट्रक्शन ॲन्ड डेकोरशन, यांची प्राकलनीय दरापेक्षा 18.51 टक्के कमी दराची रु.40,65,234 / – रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करणे व पद क्र. ए4 3901370812 अंतर्गत कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 276</u> :– नागपूर शहरातील वाहतुक पोलीस उत्तर इंदोरा पश्चिम व एम. आय.डी.सी. शाखे अंतर्गत येणाऱ्या आय.आर.डी.पी. / क्रिप मुख्य रस्त्याला थर्मोप्लॉस्टीक पेंन्टनी पार्कींग पट्टा डिवायडर ऐज लाईन, लेन मार्कींग...........इ. रोड मार्कींग करण्याचे कामाकरिता या कामास्तव प्राप्त निविदाकार मे. एम.एस.भांडारकर यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 25 टक्केनी जास्त दराची निविदा राशी रु. 59,37,500 / – ( एकोणसाठी लक्ष सदतीस हजार पाचशे रुपये फक्त ) प्रथम न्युनतम दराची निविदा मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 277</u> :– नागपूर विधानसभा भवन परिसर येथील मुख्य रस्त्यावरील फुटपाथ, डिवायडर व चॅनलाईझर व कर्व्ह स्टोन्सला ऑईल पेंटींग करण्याचे कामाकरिता या कामास्तव प्राप्त निविदाकार मे. एम.एस.भांडारकर यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 4.41 टक्केनी कमी दराची निविदा राशी रु. 35,36,830 / – ( पस्तीस लक्ष छत्तीस हजार आठशे तीस रुपये फक्त ) प्रथम न्युनतम दराची निविदा मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 278</u> :– नागपूर म.न.पा.च्या प्राथ. उच्च प्राथ. व माध्यमिक शाळेतील वर्ग 1 ते 8 मधील सर्व मुली तसेच SC,ST,VJ,NT या संवर्गातील मुलांकरीता गणवेष कापड खरेदी व शिलाई सत्र 2014 – 15 करीता सर्व शिक्षा अभियान अंतर्गत S.M.C. मार्फत शाळा स्तरावर होणार आहे. तसेच सर्व शिक्षा अभियान अंतर्गत अपात्र असलेल्या वर्ग 1 ते 8 मधील मुलांकरिता स.शि.अ. प्रमाणे गणवेष अनुदान राशी (रु. 400 / – प्रती विद्यार्थी ) म.न.पा. फंडातून शाळांना उपलब्ध करुन दयावयाचे प्रस्तावित आहे.

माध्यमिक शाळेतील वर्ग 9 ते 12 मधील मुले 2800 + मुली 3300 एकूण 6100 विद्यार्थ्याकरीता प्रति विद्यार्थी दोन गणवेष या प्रमाणे गणवेषाचे कापड मुलांकरिता हाप शर्ट व मुलींकरिता कुर्ता याकरीता लागणारे पांढरे कापडे 26500 मीटर ( प्रति मीटर रु.63/–) प्रमाणे तसेच फुलपॅन्ट करीता खाकी कापड 6800 मीटर ( प्रति मीटर रु. 149.40/–) प्रमाणे तसेच सलवार करीता नेव्ही ब्लू कापड 18500 मीटर ( प्रति मीटर रु.63/–) प्रमाणे ओढणी करीता नेव्ही ब्लु नायलॉन कापड 15000 मीटर ( प्रति मीटर रु.22.50/–) प्रमाणे कापड खरेदी मा. प्रधान सचिव (वस्त्रोद्योग विभाग ) मंत्रालय, मुंबई यांनी आदेशीत केलेल्या महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या. मुंबई यांचे कडून शासन दरानुसार खरेदी करण्यास तसेच गणवेष शिलाई महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या.नागपूर यांचे जुन्या दरानुसार करण्यास या अनुषंगाने कापड खरेदी व शिलाई करण्यास्तव येणाऱ्या रु.51,03,220/– (अक्षरी –एक्कावन लक्ष तीन हजार दोनशे विस रुपये फक्त) च्या खर्चास तसेच खरेदीस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 279</u> :– शासन निर्णय क्र. राफेधो –2013/प्र.क्र.39/नवि 34 दि. 21 आक्टोंबर 2013 अन्वये व मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि. 13 सप्टेंबर 2013 चे आदेशानुसार नागपूर महानगरपालिका सीमा अंतर्गत क्षेत्रातील आदर्श उपविधीतील व्याख्यानुसार असणाऱ्या फेरीवाल्यांचे नोंदणीकरण करण्याची कार्यवाही पुर्ण करावयाची आहे. नागपूर महानगरपालिका सीमांतर्गत क्षेत्रातील अंदाजे 40 हजार फेरीवाल्यांचे (Hawkers) नोंदणीकरण करावे लागणार आहे. सदरहु 40 हजार फेरीवाल्यांना नोंदणीकृत करून संबंधीतांच्या व्यवसायांच्या ठिकाणी पूरवावयाच्या नागरी सुविधा करीता एकुण रू. 4,06,00,000/– अंदाजीत खर्च अपेक्षीत आहे. त्यापैकी प्रत्यक्ष मौकास्थळी जावुन मौक्यावरच मौक्याचे छायाचित्र, फेरीवाल्याचे छायाचित्र व दस्ताऐवज प्राप्त करून घेवुन संगणकात सर्व Record ची साठवण करून संबंधीतांना लगेच नोंदणीकृत ID Card, Registration Plates, Certificate पूरविण्याचे काम BOT धर्तीवर प्रस्तावित करण्याचे प्रस्तावित करण्यात आले. व सदरहु कामास रू. 1,26,00,000/– खर्च अपेक्षीत आहे. ई–निविदा प्रक्रिया राबवुन सदरहु कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या. एकुण तिन इच्छुक निविदा धारकांनी निविदा सादर केलेल्या आहेत. सादर निविदेतील बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. धारीकेच्या उजव्या बाजुस पृष्ठ क्र. 58 वर टांचण आहे. सदरहु तुलनात्मक तक्त्यानुसार M/s Vidarbha Enfotech Pvt. Ltd., Nagpur यांची रू. 89,70,000/– ची निम्नतम निविदा असुन, सदरहु निविदेस मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 280</u> :– प्रभाग क्र. 34 अंतर्गत आभा कॉलनी येथे बॉक्स टाईप कल्व्हेटचे बांधकामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. महेंद्र पी. सोनटक्के, यांची प्राकलनिय दरांपेक्षा 13 टक्के कमी दराची रू. 25,18,401/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करणे व पद क्र. A42101370616 अंतर्गत कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 281</u> :– प्रभाग क्र. 60–अ, मधील संतोषी मातानगर, जुना सक्करदरा, न्यु सुभेदार नगर व गवंडीपुरा, राणी भोसले नगर येथे सी.सी. पेव्हमेंटचे बांधकामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. व्दारका कंस्ट्रक्शन, यांची प्राकलनीय दरापेक्षा 15 टक्के कमी दराची रु.30,64,284/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करणे व पद क्र. ए 22001330802 अंतर्गत कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 282</u> :– प्रभाग क्र. 42 "अ" गरूडखांब रोड येथील शिल्पा टेलर्स ते आयचित मंदीर पर्यंत सिमेंट कॉक्रीट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त 9 निविदांपैकी मे. संतोष आर खरपकर यांची प्राकलनिय दरांपेक्षा 12.89 प्रतिशत ने कमी दरांची रू. 40,39,174/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 283</u> :– नागपूर महानगरपालिका मंगळवारी बाजार सदर, नागपूर सर्वे क्र. 2581 मौजा – जरीपटका येथे स्थानीक मासोळी विपणन व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी ठोक व घावुक विपणन केंद्र अत्याधुनिक आरोग्य वर्धक मासोळी मार्केट उभारण्यात आले. सदरहु मार्केट मधील 4 दुकाने व 104 ओटे आवंटीत करावयाचे आहे. जे वर्षानुवर्षे पासुन अनधिकृत रित्या सदरहु ठिकाणावर मासोळी विक्री करणाऱ्या दुकानदारांना (दुकानदारांची यादी धारीकेच्या उजव्याबाजुस पृष्ठ क्र. 126 व 127 वर टांचण आहे.) देणेबाबात प्रश्न विचारात घ्यावयाचा आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (ड) अन्वये महानगरपालिकेच्या मालकीचा जागेचा विनियोग होणे अभिप्रेत आहे. व त्यानुसार संबंधीत बाजारातील दुकानाचे बाजार मुल्य रू. 6,25,110/ प्रती दुकान 12. 44 चौमी. क्षेत्रफळाकरीता व भाडे रू. 3234/ मासीक, ओट्याचे बाजार मुल्य रू. 1,05,776/ प्रती ओटा 2.105 चौ.मी. क्षेत्रफळाकरीता व भाडे रू. 547/ मासीक, तसेच बाजार मुल्य रू. 1,35,173/ प्रती ओटा 2.69 चौ.मी. क्षेत्रफळाच्या ओट्याकरीता व भाडे रू. 699/ मासीक अशा प्रकारे वसुल होणे अपेक्षीत आहे.

परंतु सदरहु बाजार राष्ट्रीय मत्स्यिकी विकास बोर्ड, (एन.एफ.डी.बी.) हैद्राबाद यांचे 90 % अनुदान व म.न.पा. चे 10 % अनुदान घेवुन म.न.पा.चा ठराव क्र. 284 अन्वये बांधण्यात आलेला आहे. म.न.पा. व राष्ट्रीय मत्स्यिकी विकास बोर्ड, (एन.एफ.डी.बी.) हैद्राबाद यांच्यात झालेल्या करारनाम्यानुसार गठीत करण्यात आलेल्या व्यवस्थापन समितीतील व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र मस्त्योउद्योग विकास महामंडळ मर्यादीत, मुंबई. यांचे प्रतिनिधी श्री. रामदास वासनीक यांनी व्यवस्थापन समितीच्या बैठकीत कलम 79 (ड) नुसार येणारे बाजार मुल्य आकारून सदरहु बाजारातील दुकानांचे व ओट्यांचे आवंटन करणे उचित नाही. कारण एवढे बाजार मुल्य मासोळी विक्रेते जमा करू शकणार नाही. असे निर्देशित केले. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 332 (अ) अन्वये महानगरपालिका बाजारातील कोणताही गाळा, दुकान, उभ्याने माल विकण्याची जागा यांचा भोगवटा व वापर करण्याबद्दल स्थायी समितीच्या मान्यतेने वेळोवेळी ठरविल असे दुकान भाडे, भाडे व फी आकारणेची तरतुद आहे. तसेच कलम 332 (ब) अन्वये स्थायी समितीच्या मान्यतेची उपरोक्त प्रमाणे योग्य असलेले दुकान भाडे, भाडे आणि फी किंवा त्यांचा कोणताही भाग एका वेळी एका वर्षा करीता अधिक होणार नाही अशा कोणत्याही कालावधीकरीता मकत्याने देण्याची तरतुद आहे. व कलम 332 (ड) अन्वये अशी सुध्दा तरतुद आहे कि, महानगरपालिकेच्या बाजारातील दुकानांचे, गाळ्यांचे, जागेचे आवंटन हे जाहीर लिलावाने किंवा स्थायी समितीच्या मान्यतेने अशा विशेषाधिकाराचा खाजगी रित्या विक्रीकरून विनियोग करणेची तरतुद आहे.

उपरोक्त अधिकारान्वये मंगळवारी मासोळी मार्केट येथील 4 दुकाने व 104 ओटे यांचे आवंटन सोबत जोडलेल्या यादीतील मासोळी विक्रेत्यांना दुकानाचे व ओट्यांचे येणारे बाजार मुल्य न आकारता बाजार दराप्रमाणे येणारे मासीक दुकान भाडे रू. 3234/ मासीक 12.4 चौ. मी. क्षेत्रफळाच्या दुकानाकरीता, भाडे रू. 699/ मासीक 2.69 चौ.मी. क्षेत्रफळाच्या ओट्याकरीता

व भाडे रू. 547/ मासीक 2.105 चौ.मी. क्षेत्रफळाच्या ओट्याकरीता आकारून व सदरहु दुकाने व ओटे अकरा महिन्याच्या कालावधीकरीता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित बाजाराची सुस्थिती व साफ सफाई करिता स्वतंत्र निविदा प्रशासनाने काढण्याचा प्रस्ताव लवकरात लवकर स्थायी समिती समोर ठेवावा तसेच 104 ओटे या ऐवजी 108 ओटे आहे. अशी प्रशासनाने सुचना केली या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली..

ठराव क्रमांक 284 :— श्री. राजेश रूपचंद मोटघरे, चपराशी (बडतर्फे), चुंगी विभाग, महानगरपालिका, नागपूर यांचे विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायदा 1988 चे कलम 7 आणि 13(1) ड सह 13(2) नुसार फौजदारी आरोपाखाली त्यांचे विरूध्द दोषसिध्द झालेला असल्यामुळे मा. आयुक्त यांचे दिनांक 30.10.2013 चे आदेशाविरूध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(4) चे तरतूदीनुसार स्थायी समितीकडे कलेल्या अपीलबाबत निर्णय घेण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित प्रकरणासह, तसेच कलम 56 (4) अंतर्गत स्थायी समितीकडे ज्या अपील दाखल करण्यांत येतात, त्या प्रकरणाची सुनावणी (Hearing) व उक्त प्रकरणात (कलम 56 (4) मध्ये असलेल्या तरतुदी नुसार) न्याय्य वाटेल असे आदेश देण्याचे अधिकर, अध्यक्ष, स्थायी समिती यांना प्रदान करण्यात येते, यांस समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली..

ठराव क्रमांक 285 :— स्थायी समिती ठराव क्रमांक 38 दिनांक 12/06/2014 अन्वये आरोग्य विभागाकरिता जंतुनाषक साहित्य खरेदीच्या निविदा मागविण्यात आल्या असून वर्ष 2014—15 करिता खालील निम्नतम दरानुसार एक वर्षाकरिता खरेदीचा प्रस्ताव आहे.

| अ. क्रं | निविदाकाराचे नांव | साहित्याचे नांव | निम्मतम दर प्रती लिटर/किलो | आवश्यक संख्या | खर्च एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन, ठाणे | **Dichlorvos 76% EC.ISI Mark.** | रु. ७७० | ५०० लिटर | ३,८५,००० |
| २ | मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन, ठाणे | **Pyrosene Oil-E ISI Mark** | रु. ६२० | १००० लिटर | ६,२०,००० |
| ३ | मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन, ठाणे | Deltamethrin 1.25 U.L.V ISI Mark | रु. 1590 | 300 लिटर | ४,७७,५०० |
| ४ | मे.रमेश ॲग्रो केमी. कॉर्पो.ठाणे | Bacillius thuringiesis Israraelenisis (BTI) in Aqueous Suspension approved and recommended by NVBDC/TAC | रु. 1430 | 700 लिटर | १०,०१,००० |
| ५ | मे.रमेश ॲग्रो केमी. कॉर्पो.ठाणे | **Aquatain TMF** | रु. ४४५० | २०० लिटर | ८,९०,००० |
| ६ | मे.रमेश ॲग्रो केमी. कॉर्पो.ठाणे | **Temephos 50% EC ISI Mark For Public Health Purpose** | रु. १४३० | ८०० लिटर | ११,४४,००० |
| ७ | मे.मनोहर साकोळे ॲन्ड ब्रदर्स नागपुर | Black Phenyl Grade-I (फिनाईल) | रु. 90 प्रती लिटर | 5000 लिटर | **4,50,000** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | मे.मनोहर साकोळे ॲन्ड ब्रदर्स नागपुर | Citronella Oil (सेन्ट्रीनॉल आईल) | रु. 620 | 800 लिटर | **4,96,000** |
| ९ | मे.मनोहर साकोळे ॲन्ड ब्रदर्स नागपुर | Lifebuoy (लाइफबॉय) | रु. 23 प्रति नग | 8000 नग | **1,84,000** |
| | | | एकुण | | **56,47,000** |

वर नमुद निम्नतम दरावर एकुण 9 साहित्यांच्या नावासमोर नमूद निविदाकारा कडून वर्ष 2014–15 करीता खरेदीवर वार्षीक रु. 56,47,000/– खर्च अपेक्षीत आहे. हा खर्च पद कं 206 व 606 A23101222702 - A44201272202 किंवा इतर पदा मधून भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 286</u> :– नागपूर महानगरपालिका अंतर्गत BSUP-JNNURM योजने अंतर्गत केंद्र शासनाचे 130 CSMC बैठक दिनांक 23.03.2013 अन्वये मंजूर व महाराष्ट्र शासन गृहनिमार्ण विभागाचे दिनांक 6 जुलै 2013 चे पत्रान्वये मंजूर घरांचे बांधकाम करण्याचे व निविदा मंजूर करण्याचे व त्यासाठी म.न.पा. चा हिस्सा रू. 6.86 कोटीची तरतूद मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. ठराव क्र. 92 दिनांक 2.08.2013 अन्वये समितीने उपस्थित केलेल्या मुद्याचा अनुपालन नस्तीत सादर करण्यात आले आहे. तरी निविदा मंजूर करणे व म.न.पा. चा हिस्सा 6.86 कोटी तरतूद मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन 6 महिण्याच्या मुदत वाढीसह, विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 287</u> :– नागपूर महानगरपालिका आरोग्य विभागातर्फे महाल रोग निदान केंद्र, फिजिओथेरॅपी विभागामध्ये येणा–या रूग्णांना फिजिओथेरॅपीची सेवा नियमित दिली जात असुन उक्त केंद्रात दररोज 40 ते 50 रूग्णांना लाभ होत आहेत. या फिजिओथेरॅपी केंद्रात डॉयथर्मी, अल्ट्रा साउन्ड, इन्टर फेरेसियल थेरपी, इलेक्ट्रीकल स्टीमुलेशन व ट्रॅक्शन या सारख्या विविध सुविधा उपलब्ध आहे.

सद्यस्थितीत आकारण्यात येणारे दर फारच कमी असुन त्या दरामध्ये शासकीय (GMC) दरानुसार वाढ करणे गरजेचे आहे. तसेच नुकत्याच उपलब्ध झालेल्या उपकरणाबाबत सुध्दा दर निश्चित करणे आवश्यक आहे.

शासकीय वैद्यकिय महाविद्यालय नागपूर (GMC) येथे आकारण्यात येणा–या दरानुसार प्रस्तावित दराचा तुलनात्मक तक्ता नुसार रूग्णांकडुन GMC चे Proposed दरानुसार रूग्णांकडुन आकारण्याकरिता स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

| Sr.No. | Modalities | Present Charges (Rs.) | As per GMC Charges Proposed Rate for NMC (Rs.) |
|---|---|---|---|
| **1** | Short Wave | 12/- | 30/- |
| **2** | Ultrasound(U/s) | 12/- | 30/- |
| **3** | Interferential Therapy (IFT) | 12/- | 30/- |
| **4** | Infra Red(IR) | 12/- | 30/- |
| **5** | Wax bath | 12/- | 30/- |
| **6** | Electrical Stimulation | 12/- | 30/- |
| **7** | Laser | 12/- | 30/- |
| **8** | Electrical Cervical or Lumber traction | 12/- | 30/- |
| **9** | Any Exercise | 4/- | 20/- |
| **10** | Tread Mill | NA | 30/- |

| | | | |
|---|---|---|---|
| **11** | Eillptical Exercise | NA | 30/- |
| **12** | Egronomic Cycle | NA | 30/- |
| **13** | Registration Charges | 2/- | 20/- |

Tread Mill, Elliptical Exercise, Egronomic Cycle, या सारखे नविन उपकरणे महाल रोग निदान केंद्र येथील फिजिओथेरॅपी विभागामध्ये उपलब्ध असुन उपरोक्त केंद्राचे बळकटीकरण करण्याकरिता वरिल तक्त्या मध्ये नमुद GMC चे शासकीय दर रूग्णांकडुन आकारण्याकरिता सदर प्रश्न समितीने विचारात घेऊन (13) Registration Charges - Rs. 20/- ऐवजी रु. 10/— करण्यांत येते या दुरुस्तीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 288</u> :— नागपूर महानगरपालिकेच्या बाजार विभागाव्दारे परवान्यावर देण्यात आलेल्या दुकान/जागा/ओटे चे वार्षीक परवाना शुल्कात नियमितता व एक सुत्रता आणण्यासाठी खालील प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याचा <u>प्रश्न स्थायी समितीने विचारात घेवुन जुण्या वार्षीक परवाना शुल्कात व प्रस्तावित वार्षीक शुल्कात मोठ्या प्रमाणात तफावत आहे. करीता शुल्कातील नियमीतता व एक सुत्रता राखण्याच्या दृष्टीने दर वाढीचा सुसह्य प्रस्ताव विभागाने प्रस्तावित करून स्थायी समितीकडे परत सादर करण्यास ठराव क्र. 638 दि. 13/02/2014 रोजी समितीने एकमताने मंजुरी प्रदान केलेली आहे. या अनुषंगाने पुढील प्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेला</u> प्रश्न समितीने विचारात घेऊन म.न.पा. सभागृहाकडे मंजुरी करीता पाठविण्याची एकमताने शिफारशीसह मंजूरी प्रदान केली.

अ) सर्व दुकान/जागा/ओटे चे मासिक भाडे शासनाचे चालु वर्षाचे रेडिरेकनर दरानुसार निश्चित करणे. व ते लागु करतांना सन 2014—15 या मधे 30 % नगर रचना दर लागु करणे, सन 2015—16 मधे 25 % नगर रचना दराने वाढ करणे. म्हणजेच नगर रचना दराच्या 55 % दर लागु करणे, सन 2016—17 मधे 25 % नगर रचना दराने वाढ करणे. म्हणजेच नगर रचना दराच्या 80 % दर लागु करणे व सन 2017—18 मधे 20 % नगर रचना दराने वाढ करणे. म्हणजेच नगर रचना दराच्या 100 % दर लागु करणे. व जे दर येईल त्या रकमे नुसार 3 महिन्याचे मासिक भाडे डिपॉझीट म्हणून घेणे.

ब) मुळ परवानेधारकाच्या कुटुंबातील वारसदारांच्या नावे नांव परिवर्तन करतांना रेडिरेकनर दराने 3 महिन्याचे मासिक भाडे रक्कम परिवर्तन शुल्क व नामांतरण शुल्क रू. 1000/— म.न.पा. मध्ये जमा करावे लागेल. व मासिक भाडे शासनाचे चालु वर्षाचे रेडिरेकनर दरानुसार राहील.

क) मुळ परवानेधारकाच्या कुटुंबाशिवाय इतर व्यक्तींना व्यक्तीगत करार करून/पंजीबध्द भागीदारी करून प्रथम सहभागी करून घेतात. नंतर त्या भागीदारी व्यवसायातुन स्वतः मुक्त होवुन, ताबा हस्तांतरीत करून निघुन जातात अशा वेळी कब्जेधारकाचे नावाने परवाना परिवर्तीत करतांना, परवाना शुल्क नगर रचना व मुल्यांकन विभागाने ठरवुन दिलेल्या भाडे दरानुसार आकारण्यास, तसेच त्याच दरानुसार 3 महिन्याचा एकुण भाडे रक्कम एवढे परिवर्तन शुल्क रक्कम व नामांतरण शुल्क रू. 1000/— म.न.पा. मध्ये जमा करावे लागेल. परवानाच्या मुदतीनंतरही दुकान/ओटा/जागा याचा ताबा त्यांचे कडे राहिल्यास, चालु वर्षाच्या शासनाचे रेडिरेकनर दरानुसार जे मासिक भाडे निश्चित होईल त्यात 10 % वाढ अतिरीक्त समाविष्ट करून जे दर निश्चित होईल, त्या दरानुसार भाडे आकारण्यात येईल. तसेच महानगरपालिकेची पुर्व मंजुरी प्राप्त न करता मुळ परवानेधारका शिवाय अनधिकृत परवानेधारक/कब्जेधारक ज्या तारखेपासुन पाहणीत/निरिक्षणात दिसुन आल्यास, दुकान/ओटा/जागेच्या वार्षीक परवाना शुल्क शिवाय त्या तारखेपासुन प्रति महिना रू. 2000/— प्रमाणे दंडणीय शुल्क आकारण्यात येईल.

ड) म.न.पा.ला गाळा/जागा/ओट्याची गरज असल्यास एक महिन्याची नोटीस देवुन परत घेण्याचा अधिकार असेल. तसेच एक महिन्याची नोटीस देवुन गाळेधारकांस गाळा/जागा/ओटा परत करता येईल.

<u>ठराव क्रमांक 289</u> :– नागपूर शहराचा मंजुर विकास योजनेतील आ.क्र.एम.एन.डब्ल्यु–87 ''टाऊन हॉल'' या आरक्षणाखालील 3620.50 चौ.मी. जागा संपादीत करण्याबाबत.

नागपूर शहराचा मंजुर विकास योजनेतील आ.क्र.एम.एन.डब्ल्यु–87 '' टाऊन हॉल'' या आरक्षणाखालील ख.क्र.75/3, मौजा – जरीपटका मधील 3620.50 चौ.मी. जागा ही प्रचलीत भुमी संपादन अधिनियमाच्या तरतुदीनुसार संपादीत करावी लागेल. सदर जागा संपादीत करण्याकरीता रु.11.23 कोटी (अंदाजित) राशीची आवश्यकता राहील. करीता नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेत अ.क्रएम.एन.डब्ल्यु–87 '' टाऊन हॉल'' या आरक्षणाखालील एकूण क्षेत्र 3620.50 चौ.मी.संपादीत करण्याबाबत तसेच रु.11.23 कोटीची तरतुद अर्थसंकल्पात करण्याबाबतचा निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन ,

1. ज्या अर्थी सदर्हु जागा मुळात राज्य शासनाच्या मालकीची असुन सदर्हु जागा सार्वजनिक प्रयोजना करीता विकास योजनेत आरक्षीत आहे. त्या अर्थी सदर्हु जागा नियोजन प्राधिकरणाला/समुचित प्राधिकारणाला शासनाद्वारे विनामुल्य प्राप्त होणे आवश्यक आहे.
2. सदर्हु जागेचा भाडेपट्टा (मुदत) संपुष्टात आल्या बरोबर प्रशासनाने ही जागा शासनाकडुन प्राप्त करण्यासाठी कसोशीने प्राप्त करणे आवश्यक होते. सार्वजनिक प्रयोजना करीता जागा आरक्षीत असल्याबाबत कायदेशीर तरतुदीसह जिल्हाधिकारी यांना रितसर कळविणे आवश्यक होते. जेणे करुन अर्जदाराला सदर्हु भाडेपट्टा नुतनीकरण करुन देण्यात आला नसता.
3. जिल्हाधिकारी कार्यालयाने सदर्हु जागेचे नुतनीकरण करण्यापुर्वी ही जागा नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेत आरक्षीत असल्यामुळे नियोजन प्राधिकरणाचे ना–हरकत पत्र प्राप्त केलयाशिवाय भाडेपट्टानुतनीकरण करणे नियमाप्रमाणे नव्हते असे आढळुन आलेले आहे.
4. प्रस्तुत प्रकरणात अर्जदाराने दिलेलया कलम 127 चा नोटीस म.न.पा. चे कायद्याचे जेष्ठ सल्लागार यांच्याशी सल्लमसलत करुन, विकास योजनेतील जागेची स्थिती व नियामातील तरतुदीसह तसेच मुळ भाडेपट्टयाची मुदत तपासून म.न.पा. च्या हितामध्ये समर्पक व सुयोग्य उत्तर अर्जदाराला देवून कलम 127 चा नोटीस फेटाळणे आवश्यक होते. तसे विभागाने केल्याचे प्रस्तुत प्रकरणात या स्थायी समितीस आढळुन येत नाही.
5. वरील प्रमाणे परिस्थिती लक्षात घेता विभागाने प्रस्तावित केलेली 11.23 कोटीची तरतुद जी अर्जदारास देय राहणार आहे. ती वरील मुल्यांमुळे देय राहणार आहे. असे दिसुन येते. यामुळे म.न.पा. वर अतिरिक्त बोजा निर्माण झाला आहे. प्रस्तावित आर्थिक बोजा विभागाने केलेल्या त्रुटयांमुळे निर्माण झाला आहे. असे या स्थायी समितीस प्रथम दर्शनी दिसुन यते.
6. सदर्हु जागा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 अन्वये मंजूर केलेल्या (महाराष्ट्र शासनाद्वारे) नागपूर शहराच्या विकास योजने अंतर्गत सार्वजनिक प्रयोजनाकरिता आरक्षीत असतांना या जागेचा भाडेपट्टा नुतनीकरण

करुन देणे योगय नसल्याचे या स्थायी समितीस वाटते. त्यामुळे या बाबत तातडीने ज्येष्ठ विधी सल्लगाराचे अभिमत घेवून भाडेपट्टयाचे नुतनीकरण रद्द करुन घेणे तसेच मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाला योग्य स्तरावर आव्हान देणे, या बाबतची कार्यवाही करण्याचे व त्याची संभावना तपासून कार्य करणे आवश्यक आहे. याच बरोबर मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची म.न.पा. कडुन अवमानना होणार नाही. याची काळजी प्रशासनास घेणे आवश्यक आहे.

वरील नमुद बाबी तपासुन योग्य कार्यवाही करण्यास विषय कार्यालयास परत करण्यात येतो व विभागाची संपूर्ण रितसर कार्यवाही पूर्ण झाल्यावर हा विषय परत स्थायी समिती समोर सादर करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 290 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर